# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

वर्ष ९ | अंक २ | सप्टेंबर २०२४ | मूल्य ₹ १०० | AED 10 | USD 2 | www.panthastha.com




तुमचा व्यवसाय, उद्योग, सेवा जगभरच्या निवडक लोकांपर्यंत कसा काय पोहचेल ? विश्व पांथस्थ च्या साहाय्याने विश्व पांथस्थ मासिकात जाहिरात का करावी अनिवासी भारतीय जवळपास ४८ पेक्षा जास्त देशांत स्थलांतरित झाले आहे. जवळपास २ करोड पेक्षा जास्त भारतीय या देशांत वास्तव्य करत आहेत. त्यापैकी मराठी अनिवासी साधारण २० लाख असतील. हे मराठी व अनिवासी भारतीय भारतातील अनेक वस्तूंची व सेवांची खरेदी करतात. त्याचे मूल्य दरवर्षी साधारण एक हजार करोड रुपयांपेक्षा जास्त असते. एनआरआय ची मुख्य गुंतवणूक अथवा खर्च रिअल इस्टेट, ट्रॅव्हल टुरिसम, हॉस्पिटॅलिटी, हेल्थकेअर, रेस्टॉरंट व हॉटेल, फूड, कपडेलत्ते, एजुकेशन, रिटेल सेक्टर, एफएमसीजी, सामाजिक व धार्मिक संस्थांना दान, या प्रमुख सेक्टर मध्ये होते. त्यामुळे या सेक्टर मध्ये कार्यरत सगळ्या कंपन्यांनी, व्यक्तींनी, संस्थांनी मराठी अथवा भारतीय एनआरआय पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**मासिकाबद्दल थोडक्यात -**

विश्व पांथस्थ हे अनिवासी भारतीयांसाठी २०१५ मध्ये सुरु केलेले RNI रजिस्टर्ड एकमेव मासिक आहे. आजपर्यंत या मासिकाचे छापील अंक युएई, बहरैन, सौदी अरेबिया, कुवैत, ओमान, भूतान, आफ्रिका, युरोप, रशिया, सिंगापूर, बँकॉक, मलेशिया, फार ईस्ट, अमेरिका या अनेक ठिकाणी पोहचले आहे. छापील अंक पाठवण्याचा खर्च जास्त येतो म्हणून डिजिटल स्वरूपात या मासिकाचा डिजिटल अंक सोशल मीडिया मधून अनेक सामाजिक मंडळे, बिझनेस फोरम, अनेक सामाजिक संस्था, हजारो व्यक्तींपर्यन्त पोहचतो. मासिकाची वेबसाईट आहे, एक मोबाईल ऍप आहे, त्याठिकाणी देखील जाहिरात प्रसिद्ध केली जाते. भारतात अनेक राज्यात हे छापील अंक तसेच डिजिटल अंक वितरित केले जातात. यातील असंख्य अंक फ्री दिले जातात. अनेक वाचनालये, अनेक कॉन्फरन्स या ठिकाणी हे अंक वितरित करण्याचा प्रयत्न केला जातो. महाराष्ट्र राज्य सरकारने तसेच माजी मुख्यमंत्री यांनी मासिकासाठी विशेष शुभेच्छा दिल्या आहेत व या उपक्रमाचा गौरव केला आहे.
विश्व पांथस्थ हे केवळ मासिक नाही, हा एक उपक्रम आहे. मासिक हे माध्यम आहे. आपले सहकार्य व सहभाग या उपक्रमाला एक नवीन ऊर्जा देईल. या माध्यमातूम तुमचा व्यवसाय उद्योग भरभराटीला आला तर आम्हाला त्याचा खूप आनंद होईल.

**व्यवसाय वाढीची मोठी संधी -**

तुम्ही तुमच्या वरील क्षेत्रातील प्रोजेक्ट्स, प्रॉडक्ट्स, सर्विसेस याची जाहिरात विश्व पोथस्थ मध्ये करू शकता. वरील उल्लेख केल्याप्रमाणे या अनिवासी भारतीयांपर्यंत पोहचण्यासाठी विश्व पांथस्थ एक योग्य साधन आहे. अत्यंत किफायतशीर दरामध्ये विश्व पांथस्थ मध्ये जाहिरात देऊन आपल्या व्यवसायाची, प्रॉडक्ट्स, सेवा, याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचवा, आपला बिझनेस वाढवण्यासाठी तुम्हाला याचा खूप उपयोग होऊ शकतो.

**मासिकासाठी जाहिरातीचे दर (एका जाहिरातीसाठी दर रुपयात, सर्व जाहिराती रंगीत)**

| | |
|---|---|
| **※ कव्हर पेज दोन रुपये २०,०००** | **※ कव्हर पेज तीन रुपये २०,०००** |
| **※ बँक पेज - रुपये २५,०००** | **※ पूर्ण पान रुपये १५,०००** |

ऍडव्हर्टोरिअल म्हणजे जाहिरातवजा बातमी अथवा लेख स्वीकारला जाईल. त्यासाठी मुलाखत घेणे, लेख अथवा विस्तृत जाहिरात तयार करणे, यासाठी मदत केली जाईल. त्याच्या शुल्काबाबत संपादकांबरोबर चर्चा करावी. सामाजिक उपक्रम अथवा संस्था यांना अधिक सवलत देण्यात येईल. जाहिरात ३० दिवस अगोदर बुक केली व पूर्ण पेमेंट केले तर जाहिरात दरावर २०% वीस टक्के ते ३०% तीस टक्के पर्यंत सूट देण्यात येईल. जाहिरात सॉफ्ट कॉपी हाय रेसोलुशन मध्ये पीडीएफ व सीडीआर फाईल मध्ये द्यावी लागेल. जाहिरात तयार नसेल तर जाहिरात तयार करण्यासाठी म्हणजे डिझाईन करण्यासाठी देखील मदत करण्यात येईल, डिझाईन चार्जेस वेगळे आकारले जातील. जाहिरातीचे संपूर्ण शुल्क जाहिरात प्रसिद्ध होण्यापूर्वी द्यावे लागेल.

**जाहिरातीसाठी व अधिक माहितीसाठी संपर्क -**

ई-मेल - editor@panthastha.com । मोबाईल व्हाट्सएप - +91 9860678844 ।
www.panthastha.com
धन्यवाद !
संपादक, विश्व पांथस्थ

# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

# अनुक्रमणिका


१. संपादकीय - जिथे पिकते तिथे विकत नाही, मायग्रेशन व भोज्या

२. गणेशोत्सव २०२४: जागतिक स्तरावरचा उत्सव

३. गणपती बाप्पा पोहचले व्हिएन्ना मध्ये - विशाल अहिरराव

४. नायजेरियातील गणेशोत्सव - संतोष शरद राऊत (लागोस)

५. गणेश उत्सव - अनिवासी भारतीयांसाठी एक अति महत्वाचा सण

माझं मत - प्रवीण मानकर

६. वडिलांचे मुलास पत्र - आनंद बनसोडे



विश्व पांथस्थ
वर्ष ९ अंक २
सप्टेंबर २०२४

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
संदीप वसंतराव कडवे

संपादकीय व वितरण साहाय्य
राजन ताबडे, अबू धाबी
धवल नांदेडकर, फुजेरा
देविका घोरपडे, इंदौर
नितीन गायकवाड, औरंगाबाद

मुखपृष्ठ आणि सजावट
विश्व पांथस्थ

मूल्य ₹ 100 | AED 10 | US$2

Vishwa Panthastha
Year 9 Issue 2
September 2024

First Marathi Monthly For NRIs

Editor
Sandeep Vasantrao Kadwe

Editorial & Distribution Support
Rajan Tawde. Abu Dhabi
Dhawal Nandedkar, Fujerah
Devika Ghorpade - Indore
NitinGaikwad-Aurangbad

Cover & Design
VISHWA PANTHASTHA

Price ₹ 100 | AED 10 | US$2

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए-७०३, निसर्ग सिटी -२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे - ४११०५७. येथे प्रसिध्द केले.
**संपादक - संदीप वसंतराव कडवे**
**(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)**

Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe. and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
Mob.: +91 9860678844
e-mail: editor@panthastha.com
website: www.panthastha.com
Editor - Sandeep Vasantrao Kadwe
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)



या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



# जिथे पिकते तिथे विकत नाही, मायग्रेशन व भोज्या

- डॉ. संदीप कडवे

तुमच्यापैकी अनेकांना हा अनुभव आला असेल. तुमच्या क्षमतेला, कर्तुत्वाला, सृजनशीलतेला, हुशारीला, तुमच्या आसपास, गावात, शहरात, राज्यात वा देशात वाव व सन्मान मिळत नाही. स्थानिक बाजारपेठांच्या मागणी तसा पुरवठा नियमाप्रमाणे मोजक्याच सेवांचा, उत्पादनांची, गुणांची, कौशल्याची गरज असेल, आणि तुमची बौद्धिक, शारीरिक, मानसिक, झेप मोठी असेल तर तुम्हाला तिथे वाव मिळणे शक्य नाही. मला कोत्या मनोवृत्तीच्या माणसांबरोबर राहायचे नाही, असाही एक सूर सर्वसाधारणपणे आळवला जातो. आसपासचा समाज टीका करतो, काहीजण नकाश्रू ढाळतात, कोरडी सहानुभती दाखवतात असेही अनेकांना जाणवत राहते. तुम्ही जे काही करता त्याने तुम्हाला कदाचित आनंद मिळत नाही. पैसा पुरेसा मिळत नाही. काही केल्याचे समाधान मिळत नाही. ज्यांच्याकरता करतो त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. तुम्ही चकव्यात अडकल्यासारखे तिथेच फिरत बसतात.

असे फक्त बेरोजगारांबाबत होते असे नाही. फक्त युवक युवतींबाबत होते असेही नाही. आयुष्याच्या कुठल्याही टप्प्यावर असा अनुभव येऊ शकतो. अनेक हुशार व्यक्ती केवळ त्यावेळच्या जबाबदारीमुळे जशी संधी मिळेल त्याप्रमाणे नोकरी पत्करून अनेक वर्षे त्याच रुटीन मध्ये अडकून राहतात. हातातले सोडवत नाही, नवीन संधींचा शोध घेववत नाही, नवीन संधी मिळालीच तर तिचा लाभ घेण्याची जोखीम पत्करण्याची मानसिक तयारी अनेकदा होत नाही. आसपासची परिस्थिती फारशी सकारात्मक वाटत नाही.

मग पिकतं तिथे विकत नाही असा अनुभव यायला सुरवात होते.

काही मिळवायचे असेल, तर काही काही सोडावे लागते. काळानुसार काय मिळवायचे व काय सोडायचे हा प्राधान्यक्रम बदलत राहतो. महत्वाचे आहे ते काळाबरोबर चालत राहणे. आयुष्य हे अनुभवाने समृद्ध होते. वाईट अनुभव देखील आयुष्यात खूप काही शिकवून जातो. चांगला अनुभव स्थैर्य, आर्थिक सुबत्ता, मान, सन्मान, मानसिक समाधान देतो. पण आलेल्या संधीचा लाभ घेतल्याशिवाय ती संधी चांगली कि वाईट कळत नाही. किंबहुना संधीचे सोन्यात रूपांतर करण्याची जबाबदारी आपल्यावरच असते. त्यासाठी कष्ट करण्याची तयारी लागते, सकारात्मक मानसिकता लागते, अनोळखी लोकांबरोबर काम करण्याची तयारी लागते, अंगी उपयोगी कौशल्य गुण लागतात. सर्वात महत्वाचे म्हणजे जोखीम पत्करावी लागते.

आपल्या गावापासून दूर जाणारे सर्व विस्थापित कामगार, migrant workers, हे जोखीम पत्करतात. आपल्या प्रियजनांना

सोडून अनोळखी प्रदेशात जातात. जिथे गरज असेल तिथे जातात. आपले कर्तृत्व सिद्ध करतात. जे यशस्वी होतात, ते अर्थात आर्थिक रित्या समृद्ध होतात. यशस्वी झालेल्यांचा पैसा कामी येतो. काही लौकिकरित्या अयशस्वी होतात. परंतु अनुभवाने समृद्ध होतात. त्यांचा अनुभव बहुमोल असतो, पण तो कामी येईलच असे नाही. अनेकदा त्याचे मोल न कळल्याने त्याचा लाभ घेता येत नाही.

महाराष्ट्रापुरता विचार करता चांद्यापासून ते बांद्यापर्यंतचा माणूस फार फार पूर्वी पुणे मुंबईत पोटापाण्यासाठी आला. हॉटेल मध्ये भांडी धुणे पासून ते बँकेत, सरकारात, शासनात, कंपन्यात, सर्वोच्च पदावर काम करण्यापर्यंत त्याने मजल मारली. तो चाकरमानी झाला. अनेक जणांनी स्वतःचा व्यवसाय, उद्योगधंदा सुरु केला. स्वतः स्थिरावल्यावर गावाकडून अजून चार जण पुण्या मुंबईत आणले. ते स्थिरावले. मग पुण्या मुंबईतला चाकरमानी, त्याची दुसरी पिढी भारताबाहेर गेली. दुबईत गेली, लंडनला गेली, अमेरिकेत, ऑस्ट्रेलियात, न्यूझीलंड, कॅनडा, आफ्रिकेत गेली. अधिक समृद्ध झाली. साखळी वाढतच गेली. शहरातला कमावलेला पैसा मात्र बहुतांशी शहरातच जिरला. शहरात घरे घेतली. गाड्या घेतल्या. शिक्षण आरोग्यावर पैसे खर्च झाले. उरलाच तर काही पैसा गावाकडे आला. भारतात काही गावे अशी आहेत जी केवळ NRI remittances च्या जोरावर भरभराटीला आली. पैसा गावाकडे आला, पण अनेक गावे हळू हळू ओस पडू लागली. गावात तरुण अभावानेच आढळू लागला. जो मागे राहिला त्याची काही अडचण होती म्हणून मागे राहिला. नाहीतर त्यालाही शहरात, परदेशात जाण्याची आस होतीच. शिक्षण, अनुभव, कौशल्य कमी पडले. संधी मिळाली नाही. आता महाराष्ट्र शासनाने एक योजना आणली आहे. १०,००० बेरोजगारांना जर्मनीत नोकऱ्या मिळवून देणार आहेत. ड्राइवर, सुतार, नाभिक, इलेकट्रिशिअन, प्लम्बर, धोबी, माळी, वेल्डर, फिटर, नर्सेस असे सर्वजण जर्मनीत जाण्याचे स्वप्न बघू शकतील. त्यासाठी लागणारी भाषा व इतर कौशल्ये महाराष्ट्रातच शिकवणार आहेत. इतक्या हजाराने मराठी माणूस जर्मनीत स्थिरावणार आहे असे स्वप्न दाखवले जात आहे. ते जेव्हा खरे होईल तेव्हा खरे, पण ते खरे झालेच तर सर्वप्रथम जर्मनीला व नंतर महाराष्ट्राला, पर्यायाने देशाला त्याचा फार मोठा फायदा होईल यात शंका नाही. इस्त्राईल मध्ये १० हजार पेक्षा जास्त कुशल कामगार युपी, तेलंगणा किंवा आंध्रप्रदेश मधून जात आहेत. त्यांचा कमीत कमी पगार १,९०,०००/-रू. प्रतिमहा आहे. माणूस कवचाबाहेर पडला पाहिजे. गावात कंपूत राहिला तर त्याचे शोषण होते.

भोज्या -

मनुष्य गरीब असो की श्रीमंत विवाहित असो की अविवाहित कुठल्याही धर्माचा असो कुठल्याही देशाचा असो संध्याकाळ झाली की त्याला घरीच यावसं वाटतं. काही जणांना घरच नाही ते होस्टेलला राहतात लॉजवर राहतात. तेच त्यांचे घर. पण दिवसभर राबल्यावर, किंबहुना अनेक वर्षे शारीरिक व मानसिक काबाडकष्ट केल्यावर, संपूर्ण जगभ्रमंती केल्यावर देखील एका विविक्षित ठिकाणी परत येण्याची जी प्रबळ इच्छा असते ते ठिकाण म्हणजे भोज्या.

भोज्या म्हणजे असं ठिकाण की ज्या ठिकाणी मनुष्याला मानसिकरित्या भावनिकरीत्या सुरक्षित किंवा आपलेसे वाटतं किंवा त्याचा मानसिक ओढा त्या ठिकाणाकडे असतो. अध्यात्माच्या भाषेत सांगायचं झालं तर आपण ज्या अनंतातून या पृथ्वीवर आलो आहोत त्या अनंतात विलीन होण्याची एक खोलवर दडलेली सुप्त इच्छा म्हणजे म्हणजे भोज्या. याला आपण मोक्ष असा अध्यात्मात म्हणतो. हा मोक्ष मिळण्याची इच्छा म्हणजेच मनुष्याला अंतिम भोज्याला शिवण्याची इच्छा.

सर्वसामान्य माणसाकरता आपलं घर किंवा ती वास्तू ज्याला घर म्हणतो या ठिकाणी त्याला सुरक्षित वाटतं तो म्हणजे भोज्या. अनिवासी भारतीयांकरता भारत, भारताची संस्कृती हा त्यांचा भोज्या आहे. भारतात सारखे सारखे येता येत नाही, म्हणून सणाच्या निमित्ताने, ते भारतासारखी वातावरणनिर्मिती परदेशात करतात. हे सणवार मग त्यांचा भोज्या बनतात.

आणि असं की अगदी चार पिढ्या दक्षिण आफ्रिकेत किंवा अमेरिकेत किंवा ऑस्ट्रेलिया घालवल्यावर देखील मूळ भारतीयाला वर्ष दोन वर्षातून एकदा तरी भारतात परत यावसं वाटतं. आपल्या पूर्वजांचे घर, माती, देश डोळे भरून बघावसं वाटतं, तिथली जनता बघावीशी वाटते, तिथला अनुभव घ्यावासा वाटतो.

परदेशात त्याला सुरक्षित वाटेल वाटेल परंतु त्याची मानसिकता ही मूळ मातीकडे, मूळ ठिकाणाकडे परत येण्याचीच असते. कायमचे नाही तरी भोज्यापासून आपण किती दूर आलो त्याची चाचपणी करण्यासाठी तरी त्याला भोज्याकडे परत यावेसे वाटते. यातील गम्मत अशी आहे कि, अशी चाचपणी करून झाल्यावर, अनेकांचा जुन्या अनुभवांचा व सध्याच्या परिस्थितीचा मेळ बसत नाही. आपण जगभरात कर्तृत्व दाखवले, आता आपल्या मूळ गावी आपला आदर वाढेल, वगैरे कल्पना घेऊन आलेला भोज्येकरी, इथली भयाण असंवेदनशीलता बघून खचून जातो. इथल्या सिस्टीमला फार तर चार दिवस त्याचे कौतुक वाटेल, पण नंतर ते त्यांच्या रामरगाड्यात, वर्षानुवर्षे जपलेल्या कोशात गुरफटले जातात. येण्याऱ्या भोज्येकऱ्यालाही त्यात गुरफटून घेण्याचा प्रयत्न करतात. भोज्येकरी सावध असला तर अडकत नाही, पण किती दिवस? संदर्भ बदलले असतात. माणसे बदलले असतात. मग या भोज्येकरींचा भ्रमनिरास होतो. ज्यांना ते शक्य असते, ते परत त्यांच्या मायभुमीतुन कर्मभूमीकडे जातात. ज्यांना शक्य नसते ते स्वतःभोवती कोष निर्माण करून सुख शोधण्याचा प्रयत्न करतात.

सरकारी अधिकारी रिटायर होतो नोकरीच्या कालावधीत अनेक ठिकाणी त्याची नेमणूक होते अनेक शहरात राज्यांमध्ये किंवा परदेशात तो नोकरी करतो परंतु रिटायर झाल्यावर गावाकडे यावं गावात एक घर असावं शेतीवाडी असावी निसर्गाच्या सानिध्यात परंतु आपल्या गावात राहावं असं त्याला वाटतं, भले त्या गावात त्याचा कोणी नातेवाईक नसेल किंवा असला तरी तो त्याला जीव लागेलच त्याची खात्री नाही पण तरीही त्या वातावरणात परत येण्याची त्याची मनोमन इच्छा असते. कारण तो त्याचा भोज्जा असतो.

अनिवासी भारतीयांना किंवा तुम्हाला भोज्याला शिवण्याची अनिवार इच्छा असू शकते आणि तसा तुम्ही प्रयत्न करावा ही, परंतु तुम्ही ज्याला भोज्या समजता त्या भोज्याला तुमची अनिवार ओढ आहे का हेही प्रात्यक्षिका सहित तपासून बघावे. आणि पिढी दर पिढी भोज्या बदलतोच. त्या बदलाची मानसिक व भावनिक तयारी ठेवावी.

अनिवासी भारतीयांकरता जागतिक गणेशउत्सव हा एक फार मोठा भोज्या झाला आहे. ढोल ताशा, डीजे यांनी अगोदरच परदेशगमन केले आहे. दिवसेंदिवस त्यात इतर गोष्टींची भर पडते आहे. आता दहा हजार मराठी जर्मनीत काम करणार म्हटल्यावर तिथेही अमृततुल्य व खानावळ चालू झाली तर आश्चर्य वाटायला नको. खरी निर्यात भोज्याची आहे. या निमित्ताने का होईना, मराठी माणसाची प्रगती होईल, भारतीयांची प्रगती होईल, यात खूप आनंद आहे.
जगभरच्या अनिवासी भारतीयांना गणेशोत्सव व येणाऱ्या सर्व सणांसाठी मनापासून शुभेच्छा.

डॉ.संदीप कडवे
पुणे, १२ सप्टेंबर २०२४

# गणेशोत्सव २०२४: जागतिक स्तरावरचा उत्सव ॐ

हा लेख ए आय च्या मदतीने तयार केला आहे. गणपती हि बुद्धीची देवता आहे. मानवी बुद्धिमत्ता ही जरी कृत्रिम बुद्धिमत्तेपेक्षा जरी आज घडीला अधिक चांगली आहे तरी भविष्यात ए आय च्या मदतीने मानवी जीवन अधिक सुकर होण्याची शक्यता आहे. श्री गणरायाला वंदून मानवी बुद्धिमत्तेचा कृत्रिम बुद्धिमत्तेवर कायम अंकुश राहील अशी गणरायाकडे प्रार्थना करू.

गणेशोत्सव म्हणजे भारतातल्या हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा आणि प्राचीन सण. भगवान गणेश यांचे पूजन आणि विसर्जन हे या सणाचे केंद्रबिंदू असते. भगवान गणेश हे बुद्धी, विद्या, आणि समृद्धीचे देव मानले जातात. दरवर्षी गणेशोत्सव भारतात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो, परंतु आता हळूहळू हा उत्सव जागतिक स्तरावरही साजरा केला जात आहे. २०२४ साली, भारताच्या बरोबरीने अनेक परदेशांमध्येही गणेशोत्सवाची मोठ्या धूमधडाक्यात तयारी केली जाते. या लेखामध्ये आपण विविध देशांमध्ये कसा साजरा केला जातो यावर एक नजर टाकू.

अमेरिकेत गणेशोत्सव मुख्यत्वे भारतीय वंशाचे लोक साजरे करतात, पण आता या सणात इतर लोकांचाही सहभाग वाढला आहे. श्री महावल्लभ गणपती देवस्थानम, न्यूयॉर्क, श्री व्यंकटेश्वर स्वामी मंदिर, इलिनॉय, श्री लक्ष्मी मंदिर, शलँड, हिंदू मंदिर, अटलांटा, मालिबू हिंदू मंदिर, कॅलिफोर्निया, रॉबिन्सविले, न्यू जर्सी येथील स्वामीनारायण अक्षरधाम हे अमेरिकेतील प्रमुख हिंदू मंदिरे आहेत. अनेक मराठी मंडळे आहेत.

न्यूयॉर्क, सॅन फ्रान्सिस्को, शिकागो, आणि लॉस एंजेलिस सारख्या मोठ्या व अनेक लहान शहरांमध्ये गणेशोत्सवाचे आयोजन होते. अमेरिकेत महाराष्ट्र मंडळे (बृहन्महाराष्ट्र मंडळ नॉर्थ अमेरिका, महाराष्ट्र मंडळ शिकागो, अटलांटा, बे एरिया, ऑस्टिन असे अनेक), भारतीय संघटना आणि मंदिरे या सणाचे आयोजन करतात, आणि त्यात सर्व वयोगटातील लोक आनंदाने सहभागी होतात. विशेष म्हणजे, अमेरिकेत गणेशोत्सव साजरा करताना पर्यावरण पूरक गणेश मूर्ती वापरण्याचा प्रघात आहे. २०२४ साली, अमेरिकेतील न्यूयॉर्कमध्ये गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणात लोकांचा सहभाग अपेक्षित आहे. मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून, नृत्य, गाणी, आणि धार्मिक विधींच्या आधारे गणेशोत्सव साजरा केला जाईल. विसर्जनाची प्रक्रिया अधिकतर पाण्याचे प्रदूषण टाळण्यासाठी कृत्रिम तलाव किंवा इतर पर्यायांच्या माध्यमातून केली जाते.

कॅनडातही गणेशोत्सवाची मोठी परंपरा आहे. विशेषतः टोरोंटो, वँकूवर आणि मॉन्ट्रियलमध्ये भारतीय समुदाय मोठ्या उत्साहाने हा सण साजरा करतो. कॅनडातील गणेशोत्सव अधिकतर मंदिरांच्या परिसरात आयोजित केला जातो. गणेशोत्सवाच्या काळात विविध संस्कृतीतील लोक एकत्र येऊन भारतीय संस्कृतीची झलक अनुभवतात.

युनायटेड किंगडममध्ये गणेशोत्सव साजरा करण्याची सुरुवात २०व्या शतकाच्या उत्तरार्धात झाली. लंडन, बर्मिंघम, मँचेस्टर या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात भारतीय लोकसंख्या असल्यामुळे, या सणाचा मोठ्या प्रमाणात उत्साह दिसून येतो. लंडनमध्ये गणेशोत्सव दरवर्षी 'लंडन मुरुगन मंदिर' आणि 'श्री स्वामिनारायण मंदीर' सारख्या ठिकाणी आयोजित केला जातो. २०२४ मध्ये, लंडनच्या तामिळ समुदायात हा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जाणार आहे. विविध धार्मिक विधींसोबतच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन देखील करण्यात येणार आहे. युनायटेड किंगडममध्ये साजरा होणारा गणेशोत्सव हा धार्मिक विधींपलीकडे जाऊन सामाजिक एकता आणि सांस्कृतिक आदानप्रदानाचे प्रतीक बनला आहे.

ऑस्ट्रेलियातील सिडनी, मेलबर्न, आणि ब्रिस्बेन यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये गणेशोत्सव साजरा केला जातो. भारतीय

समुदायातील लोक आपल्या कुटुंबीयांसोबत गणेशाची पूजा करतात आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. ऑस्ट्रेलियामध्ये देखील पर्यावरणपूरक गणेश मूर्तींचा वापर करण्यावर विशेष भर दिला जातो. २०२४ साली, ऑस्ट्रेलियातील गणेशोत्सवात विविध मंदिरांमध्ये धार्मिक विधींचे आयोजन केले जाईल आणि सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे स्थानिक लोकांसाठी गणेशोत्सव खुला असेल. मेलबर्नमध्ये आयोजित होणाऱ्या विसर्जन मिरवणुकीत अनेक भारतीयांसह इतर राष्ट्रीयतेच्या लोकांचा सहभाग अपेक्षित आहे.

आफ्रिकेतील काही देशांमध्ये, विशेषतः दक्षिण आफ्रिकेमध्ये, गणेशोत्सव साजरा केला जातो. दक्षिण आफ्रिकेमध्ये भारतीय लोकांची मोठी वस्ती असल्याने, तेथे हा सण उत्साहात साजरा होतो. डरबन आणि जोहान्सबर्ग येथे गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. स्थानिक मंदिरे आणि भारतीय समुदायाच्या संघटना या सणाचे आयोजन करतात. २०२४ मध्ये, दक्षिण आफ्रिकेमध्ये गणेशोत्सव साजरा करताना विविध धार्मिक विधींचा समावेश असेल, ज्यात पारंपरिक भारतीय संस्कृतीचा ठसा दिसून येईल. विसर्जनाच्या वेळी निसर्गाचे संरक्षण करण्यासाठी पर्यावरणपूरक मूर्तींचा वापर केला जाणार आहे.

जपानमध्येही 'गणपती'चं एक वेगळंच रूप आहे, ज्याची नियमित पूजा केली जाते आणि त्याला मोदकांसारखाच नैवेद्यही दाखवला जातो. मात्र तिथे तो गणपती म्हणून नाही, तर कांगितेन (कांकीतेन किंवा शोतेन), बिनायक-तेन आणि गनाबाची अशा नावांनी ओळखला जातो. हत्तीचं मस्तक आणि बाकीचं शरीर मानवाचं असा भारतातल्या गणपतीशी मिळताजुळता आकार असलेली ही देवता जपानमध्ये शतकांपासून पुजली जाते आहे. कांगितेन जपानच्या स्थानिक कथांचा आणि प्रथांचा भाग बनला आहेच, शिवाय हजारो किलोमीटर दूर असलेल्या दोन देशांना जोडणाऱ्या इतिहासाचंही तो प्रतीक आहे. गणपती आणि कांगितेनला दाखवला जाणारा नैवेद्य जवळपास एकसारखाच आहे. गणपतीला पश्चिम भारतात, विशेषतः महाराष्ट्रात मोदकांचा नैवेद्य दाखवला जातो. जपानमध्ये कांगितेनला तळलेले 'कांगिदान' अर्पण केले जातात. फक्त महाराष्ट्रात मोदकाच्या सगळ्या कळ्या जोडून टोक काढलं जातं, तर जपानमध्ये कांगिदानची पोटली बांधली जाते. इथे त्यात सारण म्हणून खोबरं आणि गूळ वापरतात, तिथे रेड बिन्सची गोडसर पेस्ट वापरली जाते.

जपान मधल्या योकोहामा मंडळात मोठ्या उत्साहात सर्व भाग गणेश भक्तांनी बाप्पांचे स्वागत केले. जपान मधला सर्वात मोठ्ठा गणेश उत्सव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योकोहामा मंडळाने ढोल ताशा झांज लेझीम च्या गजरात किरीगाओकाचा, योकोहामाचा परिसर दुमदुमला.

गणेशोत्सव आता केवळ भारतापुरता मर्यादित न राहता, विविध देशांमध्ये भारतीय संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. जागतिक स्तरावर गणेशोत्सव साजरा करताना विविध संस्कृती आणि धर्मांमधील लोकांमध्ये संवाद, समन्वय, आणि आदानप्रदानाची संधी मिळते. विविध देशांमध्ये हा सण साजरा करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या असू शकतात, परंतु त्याचा मूळ उद्देश समाजात एकता आणि संस्कृतींचे जतन करणे हाच आहे. गणेशोत्सव हा जागतिक स्तरावर एक महत्त्वाचा सण बनला आहे. भारतीय लोक ज्या ज्या देशात स्थायिक झाले आहेत, तिथे तिथे त्यांनी आपली संस्कृती आणि परंपरा जपून ठेवली आहे. २०२४ सालचा गणेशोत्सव विविध देशांमध्ये मोठ्या थाटामाटात साजरा होईल आणि तो जागतिक एकतेचा संदेश देईल. भारताबाहेर साजरा होणारा हा सण केवळ धार्मिक नाही तर सामाजिक, सांस्कृतिक, आणि पर्यावरणपूरक विचारांचे प्रतीक बनला आहे.

# गणपती बाप्पा पोहचले व्हिएन्ना मध्ये

## - विशाल अहिरराव



गणेश उत्सव २०२४ चा उत्साह आपल्याला देशभरातच नाही तर जगभरात पाहायला मिळत आहे. जिथे जिथे हिंदुस्थानी माणूस पोहोचला तिथे तिथे हिंदुस्थानची संस्कृती पोहोचली आहे. आपल्या देशापासून, लोकांपासून दूर असले तरी तिथे राहणारे हिंदुस्थानी लोक एकत्र येऊन उत्सव साजरे करतात.

ऑस्ट्रियातील व्हिएन्ना येथे सप्लाय चेन मध्ये एमेस करण्यासाठी गेलेले मानस कडवे पुण्यातील आहेत. गणपतीपूर्वी ते पुण्यात काही दिवसांसाठी परत आले होते. गणपती सुरु होण्याच्या दोन दिवस अगोदर ते व्हिएन्नाला परत गेले. जातांना बरोबर श्री गणेशाची सुंदर मूर्ती बरोबर घेऊन गेले. तेथील काही विद्यार्थी, इतर भारतीय यांनी एकत्र येत श्री व सौ चोप्रा यांच्या घरी गणेश प्रतिष्ठापना करून उत्साहात गणेशोत्सव साजरा करण्याचा त्यांचा उद्देश या निमित्ताने सफल झाला.

सामना ऑनलाईन साठी काम करणारे पत्रकार विशाल अहिरराव यांनी मानस कडवे यांची यानिमित्त सविस्तर मुलाखत घेतली. त्या मुलाखतीचे काही अंश या लेखाद्वारे प्रस्तुत करत आहोत.

**मानस, तुम्ही व्हिएन्नात आहात, व्हिएन्नात गणेश उत्सव साजरा होतो आहे, कसे काय वाटते आहे तुम्हाला?**

खूप छान वाटते आहे. अगदी घरचे फीलिंग येतंय. मी पुण्याहून येतानाच गणपतीची मूर्ती बरोबर घेऊन आलो. मूर्ती व्यवस्थित पॅक करून आणावी लागली. कारण मूर्ती बॅगमध्ये असल्याने धक्का लागून मूर्तीला काही होऊ नये म्हणून खूप काळजीपूर्वक मी व माझ्या आईवडिलांनी मूर्तीचे पॅकिंग केले. आम्ही दिड दिवसांचाच गणपती बसवला आहे. आमच्या ऑन्टी, आम्ही काही मित्र मैत्रिणी, इथे काम करणारे काही भारतीय यांनी सगळ्यांनी मिळून डेकोरेशन करून गणपती बसवला.

**मानस, हा उत्सव तुम्ही हॉस्टेल वर साजरा नाही केला.**

हो. आम्ही हा गणपती आमच्या परिचित सौ चावला ऑन्टी यांच्याकडे बसवला आहे. हॉस्टेल मध्ये इतर जण असतात. आपण आरती पूजा वगैरे करतो. एकत्र जमतो. गप्पा मारतो. हॉस्टेल मध्ये हे शक्य नाही. चावला ऑन्टी यांच्याकडे गेल्या वर्षी गणपती बसवला होता. या वर्षी मूर्ती कशी आणायची हा प्रश्न होता. मला मूर्ती पुण्यातून घेऊन जाता आली म्हणून हा योग्य जुळून आला.

**या निमित्ताने तुम्ही इतर हिंदुस्थानी नागरिक आहेत, त्यांच्या सोबत कसा संपर्क साधला? ते यात कसे सहभागी झाले?**

आम्ही कनेक्शन एस्टॅब्लिश करतो. आम्ही बाहेर सुपरमार्केट मध्ये इतर ठिकाणी असतो त्यावेळी कुणी इंडियन दिसला तर स्वतःहून जाऊन बोलतो. ओळख करून घेतो. आमचा असा एक ग्रुप व व्हाट्सअँप कम्युनिटी बनवली आहे.

**हे करतांना तुम्हाला काही अडचणी येतात का?**

मोस्टली व्हिएन्ना मध्ये इतके जास्त इंडियन नाही आहेत. आमचे व्हाट्सअँप ग्रुप्स आहेत. कुणीकुणी इनीशीएटिव घेतो नाहीतर आम्हालाच इनीशीएटिव घ्यावा लागतो. थोड्याफार अडचणी आहेत. म्हणजे सगळ्यांचे टाईमिंग जुळत नाही, अंतर दूर असते वगैरे. बाकी काही अडचणी नाहीत.

**मानस, तुम्ही ज्यांच्या घरी गणपती बसवला आहे, त्यांच्याशी आपण बोलू शकतो का?**

हो.

नमस्ते. आपका नाम क्या है?

मेरा नाम चित्रा चावला.

**चित्राजी आपला स्वागत है. आप कितने सालोंसे वहा व्हिएन्ना मे रह रहे है? और ये जो सेलिब्रेशन आपके घर में हो रहा है, आपको, कैसे लग रहा है?**

मैं अभी दो सालसे व्हिएन्ना मे हूं, अभी तिसरा साल है. मैने यह गणेश उत्सव पिछली बार पहली बार मनाया था. और

बहोत अच्छा लाग रहा है. क्यो कि हिंदुस्तान से यहा आने के बाद देश को महसूस करना हो, अपनी संस्कृती को, तो हम लोग अपने घर मे ही अपने त्योहारोंको मनाके एक छोटासा हिंदुस्तान बना लेते है . पिछली बार भी मेरे घर मे बडे अच्छे से गणपती उत्सव मनाया गया था, इस बार तो मानस हमारे लिये गणेशजी लेके आये. पहले तो मैं यहापर ढुंढ रही थी, मिल नही पा रहे थे, तो फिर बच्चोंके कॉन्टॅक्ट से मानस पुणे से गणेशजी यहा लेके आये. बहोत बहोत आभारी हूं मानस कि कि वो हमारे लिये गणेशजी पुणे से लेकरके आये. और आज सब बच्चे यहापर है और बडे उत्साह से इस त्योहार को मनातें हैं.

**किस तरहा से आप पूजा करते है वहा पे ?**

मैं जब यहा आई थी तब मेरा एक छोटासा मंदिर लेके आई थी. मेरे पास पूजा का सामान था और यहा इंडियन स्टोअर्स हैं वहा पुजाकी सामग्री अव्हेलेबल होती है. और पूजा कि विधी तो हमें पता होती है. तो यहा ऐसा नही हैं कि पंडितजी आयेंगे और हमारे लिये मंत्र बोलेंगे. तो हम लोग अपने भोले भाव सें और अपनी श्रद्धा से पूजा कर लेते है...क्यो कि हमे पता है कि भगवान तो भाव के भूखे होते है . और एक परिवार जैसे ये बच्चे मेरे पास आ जाते है और कहते है कि ऑन्टी हमको यहा आकर बिलकुल घरकी याद आ जाती है.

**गणपती बाप्पा को मोदक बहोत पसंद है, तो आप घर पे मोदक बना लेते है ?**

जी, मेरी बेटी है और मेरी भतीजी मिताली है, इस बार मिताली ने हमे मोदक घर पे बनाकर दिये है. और मैने नारियल के लड्डू भी बनाये है.

**ये बडी बात हैं कि आप विदेश मे भी अपनी देश कि संस्कृती भुले नहीं और अपने संस्कृती की रक्षा विदेश मी भी कर रहे है. मानस आतापर्यंत किती लोकं दर्शनाला येऊन गेले ?**

आता पर्यंत १५ लोकं येऊन गेले. आम्ही इथे लंगर ही ठेवला आहे. हे डेकोरेशन व लंगर साठी माझे सर्व मित्र मैत्रिणी, ऑन्टी यांनी सगळी मदत केली.

**आप सभी लोगोंको कैसे लग रहा है ?**

बहोत अच्छा लग रहा है, क्यो कि यहा हम काम मे इतने व्यस्त हो जाते है कि पता नही चलता ... तो अब हमे पता चला कि आँटीजी ने गणेशजी कि स्थापना कि हैं तो हम सब लोग आ गए ... क्यो कि हमें भी ते संस्कृती से जुडने का एक मोका मिलता है. यहा व्हिएन्ना मे भारतवासी तो इतने सारे नही है, तो बडी मुश्किलसे ऐसे मौके मिलते है जहाँ और भारतीयोंके साथ कनेक्ट करे और चर्चा करें.

मानस, तुमच्याशी बोलून खूप आनंद वाटला, असा उत्सव कायम विदेशात साजरा व्हावा, या निमित्ताने अनिवासी भारतीय जिथे जिथे आहेत तिथे तिथे एकत्र यावे, हा कलेचा उत्सव आहे, ज्ञानाचा उत्सव आहे, आपल्या वेगवेगळ्या कलाकृतींना वाव देणारा, सर्वांना एकत्र आणणारा उत्सव आहे. आम्ही तुम्हा सर्वांना खूप शुभेच्छा देतो, आम्हीपण तिथल्या गणेश उत्सवाचा आनंद घेत आहोत. सर्वांना खूप धन्यवाद. गणपती बाप्पा मोरया !!





# नायजेरियातील गणेशोत्सव

## - संतोष शरद राऊत (लागोस)

MAHARASHTRA MANDAL RESIDENTS ASSOCIATION OF NIGERIA



नायजेरिया देशातील लागोस, शहरातील महाराष्ट्र मंडळ रहिवासी संघटना नायजेरिया (MMN)- यावेळी श्री. गणेश उत्सवाच्या ३६ व्या वर्षात पदार्पण करीत आहे हा ३६ वा वर्धापनदिन. यानिमित्त स्थानिक मराठी बांधव व श्रीगणेश प्रतिष्ठापना उत्सव प्रतिवर्षाप्रमाणेच यावर्षी सुद्धा खूप जोरात, जोषात.. नाविन्यपूर्ण आणि श्रद्धेसह साजरा करत आहे..

स्थानिक अडचणींवर मार्ग काढून सर्व रीतसर नायझेरिया देशातील सरकारी नियमांचे पालन करत आपल्या भारत देशाची भारतीय सांस्कृतिक परंपरां व त्याचे संरक्षण करण्यासाठी दृढ निष्ठा दर्शवित आहे. पारंपारिक सजावटीच्या वस्तू आणि सुविधांचा कमी पुरवठा असतानाही, MMN ने श्री. गणेश चतुर्थीच्या उत्सवाला जीवंत ठेवले आहे...स्थानिक परिस्थिती कितीही कठीण असो त्यावर मार्ग काढून एक अनुकूल असे वातावरण निर्माण करून सर्व गणेश मंडळातील टीम ने खूप सुंदर व नियोजनबद्ध आयोजन केले आहे, यावरूनच हे दिसून येते की कुठलेही कार्य करण्यासाठी इच्छाशक्ती दृढ असावी लागते असे असले की मार्ग निघतात व ते कार्य सुद्धा निर्विघ्नपणे पार पडतेच...!!!

लोकमान्य बाळ टिळकांनी ज्या उद्देशापोटी श्री. गणेश उत्सव सुरु केला आज त्याची भव्यता व व्याप्ती एवढी वाढली आहे की तो उद्देश खरोखर सफल झालेला पहायला मिळतो..देश विदेशात अत्यंत धुमधडक्यात गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना होते आणी यामध्यमातून विदेशात आपापला नोकरी व्यवसाय सांभाळून ज्याला जसा वेळ मिळेल तसा वेळ काढून लोक एकत्र येतात आणी आपल्या भारतीय सनातन हिंदू संस्कृतीचे एक भव्य दिव्य असे दर्शन विदेशी लोकांना त्यांच्या भूमीत दाखवतात व विदेशी लोक सुद्धा या आपल्या भव्यतेला पाहून मंत्रमुग्ध होऊन जातात...अगदी तसेंच इथे आफ्रिका खंडातील नायझेरिया देशात राहणाऱ्या महाराष्ट्रीयन बांधवानी सुद्धा श्री. गणेशाच्या प्रतिष्ठापनेचा हा उत्सवं व ही परंपरा कायम ठेवलेली आहे रंगीबेरंगी सजावट, देवा ब्राह्मणाच्या साक्षीने सर्व विधी अगदी मंत्रोचारात पार पाडले जातात. मोठ्या DJ साउंड सिस्टम वर आरत्या व श्लोक व देवाची पदे गायली जातात गेल्या तीन दशके हा नेम कायम आहे. MMN ने नायजेरियात या सांस्कृतिक वारशाचे जतन केले आहे आणि स्थानिक परिस्थितीला अनुकूल करून अपूर्व सर्जनशीलतेसह त्याचे अनुकूलन केले आहे.

या वर्षीच्या उत्सवाने समुदायाच्या संसाधनशीलतेला दाखवले आहे. पारंपारिकपणे गणेशाच्या मूर्ती मातीच्या बनवल्या जातात, परंतु स्थानिक नायजेरियन कलाकारांनी सैंड आणि सिमेंटचा वापर करून मूर्त्या तयार केल्या आहेत, आणि MMN सदस्यांनी असामान्य सामग्रीपासून आकर्षक सजावट तयार केली आहे. या स्थानिक पद्धतीने बनवलेल्या गणेशाच्या मूर्त्या उत्सवाच्या विशिष्ट चिन्हात रुपांतरीत झाल्या आहेत, जे समुदायाच्या आत्म्याशी खोलवर जुळवतात.

१९७९ मध्ये स्थापन झालेल्या महाराष्ट्र मंडळ रहिवासी संघटना नायजेरिया (MMN) एक नॉन-प्रॉफिट संस्था आहे, जी महाराष्ट्र आणि भारताच्या सांस्कृतिक वारशाचे संवर्धन आणि आदर करण्यासाठी समर्पित आहे. याचे मुख्य उद्दिष्ट भारतीय संस्कृती, मूल्ये आणि परंपरांचे जतन आणि संवर्धन विविध क्रीडा, सामाजिक, सांस्कृतिक आणि सामुदायिक सेवांच्या माध्यमातून करणे आहे. मकर संक्रांत, शिव जयंती, महाराष्ट्र दिन, क्रीडा महोत्सव आणि गणेश उत्सव यासारखे उत्सव उत्साहाने साजरी केले जातात्, आणि यातून आपल्या भारतीय विधी आणि परंपरां यावर लक्ष केंद्रित केले जाते. आपण कुठेही राहू पण आपली संस्कृती व मूल्ये

जपून ठेऊ व त्याचे अनुकरण करू. हाच यामागील एकमेव उद्देश..

महाराष्ट्र मंडळ नायझेरिया यांचे अध्यक्ष् श्री. गिरीश जयकर यावेळी म्हणाले की आमचे मिशन नेहमीच श्री. गणेश उत्सवाचा आत्मा जिवंत ठेवणे आहे, जरी आम्ही कितीही अडचणींचा सामना करतो तरीही आम्ही श्री. गणेश उत्सवं परंपरा कायम् ठेऊ, पुढे ते हेही, म्हणाले की. आमच्या स्वयंसेवकांचा उत्साह आणि निष्ठा आणि समुदायाच्या समर्थनाने अतिशय प्रभावी काम केले आहे. एकत्रित प्रयत्न आणि सर्जनशीलतेद्वारे अडथळ्यांवर मात करणे हे खरोखरच मनोहर व कौतुकास्पद आहे.

या उत्सवाने समुदायाच्या सांस्कृतिक कॅलेंडरमध्ये एक आधारभूत स्थान मिळवले आहे, भारतीय डायस्पोरा आणि होस्ट समुदायाच्या विविध पार्श्वभूमीतील सहभागींसाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे. या कार्यक्रमामुळे व सर्वांच्या समावेशामुळे एकतेचा आणि सामूहिक कार्याचा एक सकारात्मक परिणाम दिसून येतो. समाजासाठी एकत्र येण्याची एक भावना निर्माण होते, आपण परदेशी जरी रहात असलो तरी तेथील स्थानिक लोकांच्या मदतीने व सहकार्याने आपण आपल्या संस्कृतीचे दर्शन येथील लोकांना सुद्धा घडवू शकतो. श्री. गेशाची मूर्ती तर एक स्थानिक कलाकार नायझेरियन असून सुद्धा दरवर्षी खूप सुबक व सुंदर बनवतो श्री. गणेश मूर्ती आणि सजावट या उत्सवाच्या अनुकूलतेचे आणि समुदायाच्या परंपरांप्रति समर्पणाचे प्रतीक आहेत.

या वर्षीच्या उत्सवाचे अतिरिक्त महत्त्व श्रीराम मंदिराच्या पुनर्निर्माणासह आहे, जे पाच शतकांनंतर पुन्हा उभारले गेले आहे. MMN सजावट टीम, श्री. संतोष राऊत, श्री. गिरीश जयकर, श्री. जितेंद्र मटकर यांच्या नेतृत्वाखाली, श्री. नितीन नगीने, श्री. संकेत कदम, श्री. मकरंद दहीदुले आणि इतर स्वयंसेवकांनी १८ फूट उंच आणि २२ फूट रुंद आयोध्या येथील श्रीराम मंदिराची सुंदर व कोरीव अशी लाकडी प्रतिकृती तयार केली आहे. या प्रयत्नाचे कौतुक श्री. विजय निकते यांच्याकडून केले गेले, ज्यांनी MMN गणेशोत्सवाची प्रथम स्थापना केली, आणि श्री. चंद्रमौली कुमार, भारतीय जनरल कौनसील, लागोस, नायजेरिया, यांनी स्थापनादिनाच्या दिवशी भेट देऊन टीमच्या समर्पणाचे कौतुक केले. स्थानिक पद्धतीने बनवलेली श्री गणेशाची मूर्ती, जी नायजेरियन कलाकाराने तयार केली आहे, सणाच्या उत्सवात एक विशेष असे आकर्षण असतेच.

तसेच, MMN ने सर्व वयोगटातील कलावंतांचा सहभाग यासाठी आकर्षक कार्यक्रम आयोजित केले आहेत, ज्यात मुलांसाठी चित्रकला स्पर्धा, मुली आणि महिलांसाठी मोदक बनवण्याची स्पर्धा, आणि घरगुती श्री. गणेश सजावट स्पर्धा यांचा समावेश आहे. या क्रियाकलापांसह सांस्कृतिक परफॉर्मन्स आणि सामुदायिक सभा, भगवान श्री. गणेशाचे उत्सव साजरे करतात आणि महाराष्ट्र मंडळ नायजेरियाची भारतीय डायस्पोरा बरोबर एकता आणि सामर्थ्य दर्शवतात.

भक्तांसाठी, गणेश उत्सव फक्त एक उत्सव नसून, श्रद्धा, सर्जनशीलता, आणि समुदायाचा आत्मा याचे प्रतिक आहे.  भारतीय त्यांच्या जन्मभूमीपासून दूर असतानाही, महाराष्ट्र मंडळ नायजेरिया सदस्यांनी श्री. गणेश चतुर्थीचा सण व त्याचा उत्साह इथे नायझेरिया देशातील लागोस शहरात सुद्धा जिवंत आणि कायम ठेवला आहे.

उत्सव सुरु असताना, महाराष्ट्र मंडळ नायजेरिया सांस्कृतिक संरक्षण आणि सामुदायिक एकतेचा एक दीपस्तंभ म्हणून उभा आहे, आणि हे दर्शवते की, जगातील कुठल्याही ठिकाणी असले तरी भारतीय लोक त्यांच्या परंपरेचे सदैव नेहमीच अगदी हृदयापासून पालन करतात. कोणालाही आपल्या भारतीय देशाचा अभिमान वाटावा असंच काम आपण भारतीय करतच असतो व नेहमीच करत राहू...आणी यातूनच नेहमी समृद्ध होण्याचा मार्ग सापडतो.



!!गणपती बाप्पा मोरया!!

# गणेश उत्सव - अनिवासी भारतीयांसाठी एक अति महत्वाचा सण - माझं मत

## - प्रवीण मानकर -




**देश युगांडा. वास्तव्य पूर्व आफ्रिकेतील सर्व देश आणि सौदी अरेबिया (१८ वर्षे वास्तव्य - १९९९ ते २०१७)**

जगभरातील एनआरआय गणपती मोठ्या उत्साहाने व भक्तिभावाने साजरा करतात. विश्व पांथस्थ या अनिवासी भारतीयांसाठीच्या मासिकासाठी माझे प्रांजळ मत.

१. **तुमच्या मंडळाचा गणपती उत्सव कधी सुरु झाला? तुमचा त्यात कसा सहभाग आहे?**
युगांडातील गणपती उत्सव १९८४ मध्ये श्री भट यांच्या घरात सुरु झाला. आधी छोटाश्या घरात - मी १९९९ मध्ये पोहचलो तेव्हां त्याचे सार्वजनिक स्वरूप झाले होते. दररोज ६००/७०० प्रसादरूपी जेवण करत असत. माझा सहभाग - एक उत्साही कार्यकर्ता. मी मंडप डेकोरेशन करत असे. एकदा दिंडी काढली होती दोन किलोमीटरची. एकदा भक्तांना 'अष्टविनायक' दर्शन घडवले होते. आठ मुर्त्या तयार करून घेतल्या आफ्रिकन आर्टिस्ट कडून. यावर्षी देखील मी युगांडाला गणेशोत्सवनिमित्त आलो आहे. सर्वांत मोठा बदल म्हणजे आता दोन ठिकाणी गणपती बसतात.

२. **गणपती उत्सवामुळे तुम्हाला काय फायदा झाला?**
मी लोकाभिमुख झालो. भारतीय लोक संपर्कात आले की मदत मिळते किंवा मदत देता येते. परेदशी गेल्यावर आपण एकटे असतो म्हणून मदत मदत लागते. तसंच शक्य झाल्यास मदत करावी, षंढासारखं बसून न राहावं. आपल्याला कोणाला मदत करण्याची संधी मिळाली तर ती देशसेवा समजावी अन निरपेक्षपणे मदत द्यावी. मदत दिल्या नंतर जो आनंद मिळतो तो अवर्णीय असतो.

३. **गणपती उत्सव भारतात साजरा करायचा का? त्यापेक्षा परदेशात साजरा केला जाणारा उत्सव अधिक प्रिय आहे का?**
इथे कि तेथे असा भेदभाव करण्यात काही अर्थ नाही. जिथे जिथे आनंद मिळत असेल तेथे तेथे जावे अथवा ते ते करावे. बाप्पांची पूजा करतांना निरपेक्ष आनंद मिळत असेल तरच हात जोडावे. नमस्कार नाही केला तरी चालेल - तुमचं काहीही बिघडणार नाही. परदेशात गणपती बसवला की जास्त आनंद मिळतो. जसं - परदेशात स्वातंत्र दिन साजरा करतो तसं. पररदेशात साजरा करणारा सण किंवा बाप्पा मला खचितच जास्त प्रिय आहे कारण बऱ्याच वेळा परिस्थिती विपरीत असते. तसेच माझ्या सर्जनशीलतेला येथे वाव मिळतो.

४. **तुमचे काम, नोकरी, धंदा सांभाळून तुम्ही भारतीय उत्सवात कसे काय सामील होतात? त्याने तुमच्या कामावर परिणाम होतो का?**
इच्छा तेथे मार्ग. काम किंवा धंद्यावर अजिबात परिणाम होत नाही. मी टॉप मॅनेजमेंट असल्याने मला वेळेचं बंधन नसायचं. त्यामुळे मी सामाजिक कार्याला खूप आणि केव्हांही वेळ देऊ शकत असे. अन तो दिलासुद्धा. सार्वजनिक गणपती बसवणे हे मी अध्यात्मिक कार्यापेक्षा सामाजिक कार्य समजतो. या निमित्ताने अनिवासी भारतीय एकत्र येतात. हे खूप मोठं काम आहे. सगळ्यांना एकत्र आणणं हे अवघड सुद्धा आहे. हे करतांना कधी कधी निराशा सुद्धा येते. असो.

५. **इतर अनिवासी भारतीयांसाठी तुम्ही काय सांगाल?**
जेथे जेथे, जसं जसं, जेंव्हा जेंव्हा - जमेल तेंव्हा तेंव्हा एकत्र या. संघटित होण्यात आनंद आहे. विचारांचे आदान प्रदान व्हावे. या एकत्र येण्यात राजकारण नसावे. एकलकोंडी होण्यापेक्षा समाजप्रिय होणं मी महत्वाचं समजतो. त्यावेळी तुम्हीं जेथे असाल तेथली संस्कृती सुद्धा समजून घ्या.

# वडिलांचे मुलास पत्र - आनंद बनसोडे




प्रिय अक्षन,

सातव्या वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! हे पत्र लिहिताना मनात खूप विचार येत आहेत, कारण आता तू मोठा होत चाललायस आणि तुला स्वतःचे विचार आणि निर्णयक्षमता येत आहे. प्रत्येक विचार आणि तुझे वागणे कुटुंबातील प्रत्येकाला मान्य होईल यावर तुझा आनंद आजकाल अवलंबून राहत आहे. म्हणूनच भविष्यात तुला उपयोगी पडेल असे या ७ व्या पत्रात तुला लिहीत आहे.

मी तुला अशी एक गोष्ट सांगणार आहे ज्याचे आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर स्वतःचे सिंहावलोकन केले पाहिजे ती म्हणजे - इमोशनल स्लेव्हरी आजूबाजूला पहा अनेक लोक अनेक प्रकारची गुलामगिरी करत आहेत ज्याची त्यांना जाणीवही नाही. कोणत्यातरी व्यक्तीचा, विचारधारेचा, नात्याचा इमोशनल स्लेव्ह बनलेली अनेक लोक तुझ्या आजूबाजूला असतील. एखाद्याला स्वतःच्या इमोशनल लॉकअप मध्ये ठेवणाऱ्या लोकांचे समाजात, कुटुंबात खूप मोठे चेव असते. आयुष्यात प्रत्येक टप्प्यावर तुला असे लोक भेटतील की तुझ्यावर प्रेम करून तुला इमोशनल स्लेव्ह (गुलाम) बनवतील. आमच्या म्हणण्याप्रमाणे तू काही करत नाहीस म्हणून अश्या लोकात तुझे स्वतःचे आईवडील, बायकोही असू शकते. एक गोष्ट लक्षात ठेव, आयुष्याचा प्रवास फक्त तुझा आहे. कधीही इतर लोकांच्या अपेक्षांच्या ओझ्यात बुडू नकोस. कुटुंब, नाती, आणि समाज यांचे तुझ्यावर खूप प्रेम असणार आहे, पण याच प्रेमामुळे कधीही तुझ्या स्वप्नांना आणि इच्छांना दूर करून जगू नकोस. तुला कधी वाटलं की तू स्वतःला विसरत चाललायस, तर थांब आणि तुझं हृदय काय म्हणतंय ते ऐक. Paulo Coelho च्या The lchemist मध्ये म्हटलंय, "Your heart is your greatest guide. Listen to it, even if it's afraid" म्हणूनच, कोणतीही परिस्थिती असली तरी तुझं अंतर्मन काय म्हणतंय, याचा आवाज कधीही दाबू नकोस. जगभर भटकंती करताना मी स्वतःच्या हृदयात काय सुरु आहे यावर नेहमी लक्ष ठेवतो. विप्पशनेमुळे स्वतःच्या आत काय सुरु आहे हे पाहण्याची कला मी आत्मसात केली आहे. विप्पशनेत सांगितल्याप्रमाणे तुझ्या चित्ताची शुद्धता असेल, तुझे goal कोणालाही त्रासदायक नसतील, कोणत्याही इमोशनल स्लेव्हरीला खतपाणी घालणारे नसेल तर जगात इतर कोणताही विचार करण्याची गरज नाही. तुझी कर्तव्य, समाज, प्रेम तुला तुझ्या मनाप्रमाणे, स्वच्छंदी जगण्यावाचून कधीही थांबवून ठेवणार नाहीत याबाबत नेहमी दक्ष राहा.

मोठी स्वप्नं बघ आणि ती पूर्ण करण्यासाठी मेहनत कर. आयुष्यातले खरे यशस्वी लोकं कधीच सहज मिळालेल्या गोष्टींवर समाधान मानत नाहीत. तुझ्या मनाला जे खरं वाटतं, तेच फक्त महत्वाचं आहे. "When you want something, all the universe conspires in helping you to achieve it". हे वाक्य तुझं आयुष्य घडवणाऱ्या तत्त्वांपैकी एक असावं.

दुसरी गोष्ट आहे ती म्हणजे आयुष्यात सर्व काही सोडण्याची तयारी ठेव. बदल हाच जीवनाचा सर्वात मोठा भाग आहे. हे आयुष्यभर कुठेतरी वाचशील, ऐकशील पण जेव्हा तुला सर्व काही सोडून बदलण्याची, नव्याने सुरवात करण्याची वेळ येईल तेव्हा अनेक गोष्टी तुला थांबवण्यासाठी तयार असतील. अश्या वेळी रिबेल बन. आजूबाजूची सर्व बंधने, इमोशनल लॉकअप तोडून बदलाला सामोरे जा व पुन्हा एकदा सर्व काही निर्माण करण्यासाठी पाऊले उचल. काहीही केले तरी बदलाच्या मार्गांवरून चालल्यानंतर तुला व इतरांनाही तुझा अभिमानच वाटेल. एव्हरेस्टसहित जगातील सर्वोच्च शिखरे सर करताना, ९ वी नापास होऊनही पुढे शिक्षण घेताना, ५ पुस्तके लिहिताना व २५-३० देश भटकताना प्रत्येकवेळी बदलाना (Change) सामोरे कसे जायचे यात जणू मी PhD केली आहे. म्हणूनच सर्वकाही Give Up करून साधारण आयुष्य जगण्याबद्दल मी कधीच विचार केला

नाही. बदलाबाबत भीती असणे हे तू आहे त्या ठिकाणी आयुष्यभर राहण्याला कारणीभूत ठरू शकते. बदलाबाबत (Change) सर्वात जास्त excited असणे हे सर्वात मोठे भांडवल माझ्याजवळ आहे.


तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे, Keep it Light.
इन्व्हेस्टमेंट, प्रॉपर्टी, पैसा हा जरी महत्वाचा असला तरी आयुष्यात कधी कधी Mental Possessions तुला खाली ओढत राहतील. आयुष्यात सर्व प्रकारचे आर्थिक गोल्स पूर्ण करत असताना पुढील झेप घेण्यासाठी, बदलाना सामोरे जाण्यासाठी स्वतःला Light ठेवणे गरजेचे आहे. माझ्याकडे गमावण्यासारखे काहीच नाही हा मेंटल सेल्फ बिलीफ तुला spiritual बनवेल व सर्व दिशेने झेप घेण्यासाठी प्रोसाहीत करेल.

हे सर्व गुण तुला फक्त माझी पत्रे वाचून, पुस्तके वाचून येणार नाहीत. जोपर्यंत या सर्व तत्व, वाक्यांचा प्रॅक्टिशिनिअर होणार नाहीस तोपर्यंत असा mindset तुझ्यात येणार नाही.

हे पत्र जेव्हा वाचशील आणि समजून घेशील तेव्हा नक्कीच त्या काळासाठी हे मार्गदर्शक ठरेल. तू जेव्हा मोठं होशील, तेव्हा तुला स्वप्नं पूर्ण करण्याच्या खूप संधी मिळतील. त्या संधींना साधण्यासाठी तुझं मन, तुझी ऊर्जा, आणि तुझी जिद्द कायम ठेव.
वाढदिवसाच्या अनेक शुभेच्छा!

तुझा पप्पा,
आनंद अशोक बनसोडे

**माऊंट एव्हरेस्ट गिर्यारोहक ज्याला GoDaddy IND द्वारे टॉप २५ हस्टलर्स आंत्रप्रेन्योर्स ऑफ इंडिया द्वारे मान्यता मिळाली. लेखक-५ पुस्तके, वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर, UN SDG.**



Vishwa Panthastha CR No. MAHBIL/2018/69261

**पांथस्थ फार्म स्टे पुण्यापासून १४० किमी. विठ्ठलवाडी. शांत निसर्ग. विविध झाडे. पक्षी. वेगवेगळी शेती. पायवाट. तुम्ही व तुमच्या कुटुंबासाठी. दोन दिवस सवडीने निसर्गाच्या सानिध्यात येऊन राहण्यासाठी. पांथस्थ फार्म स्टे. काहीच करू नका. फक्त निसर्गासोबत राहा. अवलोकन करा. सगळ्यात सुंदर वेळ म्हणजे पहाटेची व सायंकाळची. नयनरम्य सूर्योदय व सूर्यास्त अनुभवा.**



**Panthastha Farm Stay 140 km from Pune. Vitthalwadi. Peaceful nature. Trees. Birds. Various farms around. The trail. You and your family. Come and stay at Panthastha Farm Stay for two days to get close to the nature. Do Nothing Just be with the nature. Observe. The most beautiful time is the morning and the evening. Experience the picturesque sunrise and sunset.**

Two other options are also available. At Dongarwadi, at the end of Tamhini Ghat, 70 km from Pune and other option is near Raigad.

**Contact:**
**farmstay@panthastha.com | WhatsApp +91 9860678844**